पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ८**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २६/५/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

## उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

**विषय क्र. १२६**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ४ कार्यालयाचे नियंत्रणाखालील हडपसर–मुंढवा, वानवडी–रामटेकडी, कोंढवा–येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयांकडील दि. १/४/२०२० ते दि.३०/४/२०२० चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ४ यांचे जा.क्र. समआ–४/३६५ दि.१३/५/२०२० चे पत्र.

**विषय क्र. १२७**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ चे अखत्यारीत येणाऱ्या ढोले पाटील रोड/येरवडा–कळस/नगर रोड (वडगांवशेरी) क्षेत्रिय कार्यालयाकडील माहे एप्रिल २०२० चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ यांचे जा.क्र. उप–१/६८८ दि.१५/५/२०२० चे पत्र.

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. १२८**

दि. २३/४/२०२० ते दि. ३/५/२०२० अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण २३ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/५८ दि. ६/५/२०२० ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्र. १२९**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि.१६/४/२०२० ते दि.३०/४/२०२० पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.४/६३ दि.१४/५/२०२० चे पत्र.

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्र. १३०**

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील पेठ गुलटेकडी, पर्वती सन २०१६–१७ मधील आकारणी प्रकरणांची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/२११ दि. १८/५/२०२० ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. १ सन २०२०–२०२१ चा विचारासाठी.

**विषय क्र. १३१**

कर आकारणी व कर संकलन कार्यालयाकडील सन २०१०–११ मधील पेठ शिवाजीनगर अे फॉर्म क्र. ३८ या मिळकतीच्या आकारणी प्रकरणाची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/२३२ दि. १९/५/२०२० ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. २ सन २०२०–२०२१ चा विचारासाठी.

## सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

**विषय क्र. १३२**

घनकचरा वाहतूकीची वाहने व बकेट दुरुस्तीसाठी ठेका पध्दतीने वेल्डर, फिटर, ॲटो इलेक्ट्रिशियन, स्प्रे पेंटर, सुतार व हेल्पर सेवक घेणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे. जयभवानी एंटरप्रायजेस, पुणे यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु. ८९,५१,२०४/- पेक्षा ९.११% ने जादा) असल्याने त्यांचेकडून सदरचे काम करुन घेणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/७० दि. १९/५/२०२० चे पत्र.

१) प्रकरणी मे. जयभवानी एंटरप्रायजेस, पुणे यांचेकडून त्यांचे टेंडर दराने (९.११% जादा) याप्रमाणे शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या नविन वाढीव डीए (महागाई भत्ता) आदा करुन रक्कम रु.९७,६६,६५८.६८ (अक्षरी रक्कम रुपये सत्याण्णव लाख सहासष्ट हजार सहाशे अठ्ठावण्ण पैसे अडोसष्ट फक्त) पर्यंत आवश्यकतेनुसार घेणेस व त्यापोटी त्यांचेबरोबर करारनामा करणेस,

२) घनकचरा वाहतूकीची वाहने व बकेट दुरुस्तीसाठी मनपाकडे सेवकवर्ग अत्यंत अपुरा असल्याने कंत्राटी सेवकांची सेवा बंद केल्यास मनपाचे मोटार वाहन विभागाकडील कामकाजामध्ये अडथळे येण्याची शक्यता असल्याने दि. ०१/०४/२०२० पासून या निविदामधून ठेका पध्दतीने वेल्डर, फिटर, ॲटो इलेक्ट्रिशियन, स्प्रे पेंटर, सुतार व हेल्पर सेवक घेण्यात येणार असल्याने सदरचे सेवकांचे कामास पश्च्यात मान्यता मिळणेस

३) प्रकरणी दि. ०१/०४/२०२० पासून मान्यता मिळेपर्यत घेण्यात येणाऱ्या कंत्राटी सेवकाचे वेतनापोटी देय बिले या निविदामधून आदा करणेस.

४) दि. ०१/०४/२०२० पासून दि.१७/५/२०२० पर्यंत प्रस्तावित निविदा वापरुन काम करुन घेणेस

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. १३३**

बिबवेवाडी स.नं. ६५९/४ व ६५९/५ या जागेचा ताबा पुणे महानगरपालिकेकडे आहे. त्यानुसार मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील संदर्भ क्र. १ व २ नुसार मे.उच्च न्यायालयाचे आदेश अवलोकन होवून सदर मिळकतीच्या जागेचा मोबदला र.रु. २,५१,८४,७८०/- श्री.ईश्वर नरेंद्र चिल्लाळ यांचेतर्फे कुलमुखत्यारधारक श्री.अरविंद मा.कोंढाळकर यांना रोख स्वरुपात अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/५१ दि.३०/४/२०२० चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. १२/५/२०२० च्या सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

**विषय क्र. १३४**

अग्निशमन सेवा पुरविणेच्या दरामध्ये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे दरवाढ करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अग्निशमन/७१ दि.२०/५/२०२० चे पत्र.

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)

**सुचना - कोरोना विषाणूमुळे उद्भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती.**